ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 10 | JUNE - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान (1950-2010)



**विवेकानंद माने**
**क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल**

## प्रास्ताविकः

1857 च्या उठावानंतर भारतात शिक्षणाचा प्रसार होऊन राजकीय चळवळ उभी राहिली. इंग्रजी शिक्षणाच्या मुशीतून बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णूशास्त्री पंडीत, गोपाळ गणेश आगरकर असे अनेक समाज सुधारक निर्माण झाले. आपल्या लेखणीने त्यांनी बालविवाह-प्रतिबंध, विधवाविवाह, केशवपन- प्रतिबंध, स्त्रीशिक्षण यासारख्या विषयांना वाचा फोडली. परंतु या समाजसुधारकांचे कार्य लिहिता-वाचता येणाऱ्या विशिष्ट वरिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले. सामाजिक सुधारणेचे कार्य लक्षावधी गरीब, अडाणी व शूद्र मानले गेलेले शेतकरी तसेच कामगार, कष्टकरी या वर्गापर्यंत नेण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. त्यांच्या चळवळीचा वारसा राजर्शी शाहू महाराज, भास्करराव जाधव, केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी चालविला. सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांच्या नेत्यांवर म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रभाव होता. साहजिकच समाजातील अज्ञान, विषमता, दारिद्रय, पिळवणूक दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून येते.

भारतीय राजकारणात विविध डावे पक्ष निर्माण झाले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. सांगली जिल्ह्यातही भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कामगार किसान पक्ष, लाल निशाण पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष श्रमिक मुक्ति दल अशा या डाव्या पक्षांच्या शाखा निर्माण झाल्या. त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सहकार या क्षेत्रात भरीव असे कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अभ्यास आपण करणार आहोत.

## संशोधनाची उद्दिष्टे:

1. देशाच्या समाज सुधारणेच्या चळवळीत तत्कालीन सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
2. सांगली जिल्ह्यातील समाज सुधारणेच्या चळवळीचा चिकित्सक अभ्यास करणे.
3. सामाजिक चळवळीतील विविध पद्धती अभ्यासणे.
4. सामाजिक क्षेत्रातील चळवळीमुळे झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
5. डाव्या चळवळीने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके:**

1. देशातील समाज सुधारणेच्या चळवळीत सांगली जिल्ह्यातील डाव्या चळवळीचा सहभाग महत्त्वाचा आहे.
2. डाव्या आघाडीच्या समाजसुधारणेच्या चळवळीमुळे देशातील सामाजिक सुधारणेला बळ मिळाले आहे.
3. साक्षरता मोहिमेमुळे शैक्षणिक क्षेत्रात प्रगती घडून आली आहे.
4. सामाजिक विविध सामाजिक चळवळीमुळे सण-समारंभातील अवाढव्य खर्चास आळा बसला आहे.
5. अ.नि.स.ने चालवलेल्या अंधश्रद्धा निर्मूलनामुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीस गती मिळाली आहे.

**संशोधनाचे महत्व:**

1. डाव्या आघाडीने उभारलेल्या चळवळीमुळे समाजात ग्रंथप्रामाण्यवाद कमी होऊन बुद्धिवादाचे प्रमाण वाढले.
2. विविध सामाजिक चळवळीमुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल घडून आले.
3. विविध सामाजिक चळवळीमुळे स्पृश्य-अस्पृश्य भेद कमी झाला.
4. विविध सामाजिक चळवळीमुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल घडून आले
5. या चळवळीतून लोक नेतृत्वाचा उदय झाला.

## सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे सामाजिक कार्यः

### १. साक्षरता प्रसारः

नाना पाटील यांनी राजकीय चळवळीला प्राधान्यक्रम दिलेला असला तरी त्यांचा मूळचा पिंड सामाजिक कार्यकर्त्याचाच होता. त्यांनी खेड्यातील शेतकऱ्याना साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी जिल्हाभर पायी दौरे काढले. पुढे अनेक शाळा जिल्हाभर सुरू झाल्या. त्यातून साक्षरतेचा प्रसार घडून आला.

### २. गांधी लग्न पद्धतः

नाना पाटलांनी जनतेला सावकारशाहीच्या पाशातून वाचविण्यासाठी सत्यशोधकीय विवाहांचे पुनरूज्जीवन करुन लग्नातील खर्चाला फाटा दिला. लग्नातील रूसवे-फुगवे वर्ज्य केले. नवरा-नवरीला खादीचे कपडे व मंगळसूत्र असे मोजकेच साहित्य घेऊन 20-25 रुपयात लग्ने लावण्यास सुरूवात केली. या लग्नात महात्मा गांधीजींचा फोटो ठेवला जाई. नाना पाटील व त्यांचे मित्र स्वामी रामानंद भारती मंगलाष्टका म्हणत. लग्नानंतर वधू-वर गांधीजींच्या फोटोस नमस्कार करुन देशसेवेसाठी कटिबद्ध राहण्याची शपथ घेत.

### 3. स्त्री-पुरुष समता चळवळः

जागतिक पातळीवर 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्यानंतरच्या कालखंडात विविध देशातील स्त्री-पुरुष समता चळवळीने गती घेतली. सांगली जिल्ह्यातही विविध डाव्या राजकीय पक्षांच्या महिला संघटना दिर्घकाळ कार्यरत आहेत. त्यामध्ये शेकापच्या प्रभाताई सूर्यवंशी, लाल निशाण पक्षाच्या गिता ठाकर, भाकपच्या सुमन पुजारी, माकपच्या रेहाना शेख, श्रमिक मुक्ती दलाच्या इंदुताई पाटणकर, गेल आम्वेट यांचा सहभाग दखलपात्र आहे. या महिलांच्या नेतृत्वाखाली असलेल्या संघटनानी स्त्री-पुरुष समता चळवळीचे कार्य प्रभाविपणे सुरु ठेवले. आजही या चळवळी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या दिसून येतात.

### 4. धर्मांध शक्तीविरोधी मानवी साखळीः

6 डिसेंबर 1992 रोजी बाबरी मशीद जमीनदोस्त झाली. या धर्मांध शक्तींना विरोध म्हणून अण्णांनी वाळवा ते सोनवडे (ता. शिराळा) या 80 कि. मी. अंतरावर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणून मानवी साखळीचे आयोजन केले. नागनाथ अण्णानी रोमहर्षक व

धाडसी कार्य करून एक आगळा वेगळा इतिहास घडविला. त्याचप्रमाणे सांगली, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यात बिमोड दिन साजरे केले. भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर सत्तेच्या राजकारणात न पडता जनतेला खरेखुरे स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी जेथे अन्याय होत असेल तेथे तो दूर करण्यासाठी पुढाकार घेण्यात ते सतत अग्रेसर राहिले.

### 5. डाव्या चळवळीतील सामाजिक उपक्रम-बळीराजा स्मृती धरणः

खानापूर तालुक्यातील बलवडी (भा.) व तांदूळवाडी या दोन गावाजवळ वाहणाऱ्या येरळा नदीकाठी बळीराजा स्मृति धरण हे छोटे धरण बांधण्यात आले. हे केवळ धरण नसून ती दुष्काळ हटवण्याची एक चळवळ बनली. केवळ रोजगार हमी योजनेची कामे करून दुष्काळ हटणार नव्हता. तालुक्यातील नद्यांचा व विहिरींचा अभ्यास करून दुष्काळ का पडतो याची चर्चा करण्यात आली. 1986 मध्ये पुरोगामी चळवळीच्या वतीने धरणाची कल्पना मांडण्यात आली. यामधील डॉ. भारत पाटणकर यांची तात्त्विक बैठक व संपतराव पवार यांचे संघटन कौशल्य यामुळे धरणाच्या कामाने वेग घेतला. परमिट पद्धतीने वाळू विक्रीतून निर्माण होणाऱ्या भांडवलातून व श्रमदानातून राबणारी जनता येरळेत पाणी साठवणारे धरण बांधेल अशी मागणी करण्यात आली. लोकाश्रय व लोकवर्गणी यातून धरणाचे बांधकामही सुरू झाले. सप्टेंबर 1989 मध्ये या धरणात पाणी अडविण्यात आले आणि जूलै 1990 पासून समान पाणी वाटप योजनेची कार्यवाही सुरू झाली. या धरणातील पाणी फिरत्या सिंचन व्यवस्थेमार्फत कोणतेही पैसे न घेता शेतकऱ्याना पिकासाठी देण्यात आले. यानंतर कृती समितीमध्ये क्रांती स्मृती वनावरून वाद सुरु झाला. त्याचा परिणाम या धरणावर होऊन धरणावर दारे बसविण्याचे काम अपुरे राहिले. अडविलेल्या पाण्याचा पूर्ण उपयोगही केला गेला नाही. त्यामूळे आजही हे धरण अपूर्ण स्थितीमध्ये आहे. संपतराव पवार आणि त्यांचे बलवडीतील समर्थक धरणाच्या संबधित कार्यापासून बाजूला गेले.

### 6. क्रांतिस्मृतीवन- डाव्या विचारांच्या नेत्याचा देशभक्तीचा जाज्वल्य प्रयोगः

संपतराव पवारांनी बलवडी येथे क्रांतिस्मृतीवन प्रतिष्ठाण स्थापन केले. कोणतीही शासकीय मदत न घेता स्वतःची 10 एकर जमीन या प्रतिष्ठाणला देऊ केली. 1 आक्टोबर 2000 रोजी स्वातंत्र्यसैनिक धोंडिराम माळी यांच्या हस्ते नव्या क्रांतिस्मृती उभारणीच्या कार्यास प्रारंभ झाला. आदर्श विद्यालय, कामेरी येथील विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या क्रांतिस्मृतीवनात भारतीय थोर मातांचे स्मृती जतन करण्यासाठी लावलेल्या वृक्षांची संख्या 51 आहे. याषिवाय नारळ, लिंबू, चिंच, सुरू आदी 2500 वृक्ष आहेत. प्रत्येक झाडाला विशिष्ठ नावाने ओळखले जाते. त्या झाडावर छोटे फलक लावलेले आहेत. सर्वच परिसर नैसर्गिकदृष्ट्या रमनीय बनविला आहे. येथे पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक अभ्यासक, साहित्यिक, विचारवंत या स्थळाला भेट देतात. येथे विविध ज्वलंत विषयावर चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली जातात, विचारांची देवाणघेवाण केली जाते. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक महाविद्यालये या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शिबीर (एन.एस.एस.) आयोजित करतात. हे क्रांतिस्मृतीवन लोकवर्गणीतून साकार झाले आहे. लोकसहभाग असेल तर चांगल्या गोष्टीची निर्मिती करता येते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे हे क्रांतिस्मृतीवन होय.

### 7. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीः

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) चे स्थापनेपासून अध्यक्ष महाराष्ट्रातील डाव्या विचारांचे नेते प्रा. एन. डी. पाटील होते. अंनिसचे काम नरेंद्र दाभोळकर यांच्या नेतृत्वाखाली 1989 साली सुरू झाले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात अंनिसच्या कार्यकर्त्यांचे संघटन होऊन संघटना गतिमान झाली. जेथे अंधश्रद्धेच्या घटना घडल्या तेथे अंनिसच्या कार्यकर्त्यांनी विरोध करून आव्हान दिले. ज्या त्या ठिकाणी तेथील कार्यकर्ते अंधश्रद्धेच्या विरोधी कृती करत होते. सातारा येथे डॉ. दाभोळकर, सांगली येथे डॉ. प्रदीप पाटील, लातूर येथे माधव बावगे तर पुणे येथे मिलिंद देशमुख हे प्रामुख्यानेसर्वत्र क्रियाशील होते. अंनिसचे कार्यकर्ते प्रश्नाना ताकदीने भिडत व वैचारिक प्रबोधनात अग्रभागी असत.

**नरेंद्र महाराजाविरुद्ध निदर्शनेः**

1997 साली नाणीज मठाचे नरेंद्र महाराज यांच्या भोंदूगिरीविरुद्ध शिवाजीराव शिंदे, शंकरराव थोरबोले, हणमंतराव रेंधाळकर, बाजीराव जाधव या शे.का.प.च्या कार्यकर्त्यांनी तासगाव शहरात व तालुक्यात लोकजागृती करून महाराष्ट्रात पहिल्यांदाच निदर्शने करून त्याला पळवून लावले. अक्षरश: नरेंद्र महाराजांनी पलायन करीत असताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते पाठलाग करीत होते. तर शहरवासीय शहर बंद ठेवून हा पलायनाचा खेळ पाहत होते.

**वास्तुतज्ञांना विरोधः**

आनंद पिंपळकर व रविराज अहिरराव असे दोन मोठे वास्तुशास्त्री महाराष्ट्रामध्ये वास्तुशास्त्राचा महिमा सांगत फिरत होते कधी मोफत तर कधी तिकीटावर मनोरंजनाच्या नावाखाली एकपात्री नाट्यप्रयोगाचे प्रमाणपत्र घेवून मोठ्या शहरात कार्यक्रम लावायचे. या कार्यक्रमातून गिहाईक शोधायचे आणि आपल्याकडील वस्तू भरमसाठ किंमतीत विक्री करायचे. अशी पद्धत ही मंडळी वापरत होती. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या वास्तुतज्ञांच्या कार्यक्रमांना विरोध केला. आनंद पिंपळकर यांना संतती प्राप्तीसाठी उपाय सांगताना कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. 2006 मध्ये रविराज अहिरराव यांचा वास्तुरविराज कार्यक्रम जाहीर झाला. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाला विरोध केला.

**8. एकतर्फी प्रेमप्रकरणाला विरोधः**

1991-92 मध्ये सांगली जिल्ह्यात एकतर्फी प्रेमप्रकरणातून अनेक मुलींचे खून झाले. अमृता देशपांडे (सांगली), आरती जोशी (शिराळा), शोभा तांदळे (इस्लामपूर), शशिकला ओझा (मिरज) या मुलींना आपले प्राण गमवावे लागले. या प्रकरणात जिल्ह्यातील डाव्या चळवळीतील विद्यार्थी, युवक संघटना, तसेच पक्षांनी एकत्र येऊन मोर्चे काढले व आरोपींना कडक शासन करा अशी मागणी केली. या मागण्यांची दखल घेऊन पोलिसांना तपासकार्य गतीने करणे भाग पडले.

**9. जातिअंत संघर्ष समितीचे कार्यः**

2006 मध्ये तामिळनाडू येथील एका गावात गावकयांनी दलित वस्ती व गाव यांच्यामध्ये भिंत बांधली व दलितांशी संपर्क तोडून टाकला. तेथील मा.क. पक्षातील कार्यकर्त्यांनी आंदोलन करून ती भिंत पाडून टाकली. या घटनेची प्रतिक्रिया देशभर उमटून दलित-सवर्ण संघर्ष सुरु झाला. जिल्ह्यात या घटनेचा निषेध करण्यात येऊन जातिअंत संघर्ष समिती स्थापन करण्यात आली. या समितीत डॉ. भारत पाटणकर, गौतमीपुत्र कांबळे, उमेश देशमुख, गौतम लवटे, धनाजी गुरव, डॉ. बाबुराव गुरव, यांचा समावेश होता. या समितीने आंतरजातीय विवाह मदत केन्द्र स्थापन करून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. जिल्ह्यात अनेक ठिकाणी जात पंचायती अस्तित्वात होत्या. त्यांच्या संदर्भातील आलेल्या तक्रारींचे निवारण संबंधित ठिकाणी जाऊन समितीने सोडविले. तसेच जिल्ह्यात जातिवाचक शिवीगाळ करणारी प्रकरणे जागेवर जावून त्यासंबंधीचे वाद-विवाद मिटवण्याचे कार्य केले.

**10. विविध पुरस्कार:**

**क्रांतिअग्रणी पुरस्कार, कुंडलः**

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड फाऊंडेशन, कुंडल या सामाजिक संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच संगीत, कला, क्रीडा, साहित्य, चित्रपट, नाट्य या सांस्कृतिक क्षेत्रात अतुलनिय कार्य केलेल्या व्यक्तीला या पुरस्कराने गौरविण्यात येते. 2000 सालापासून जी. डी. बापू लाड यांच्या 4 डिसेंबर या वाढदिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

### क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार, विटाः

क्रांतिसिंह नाना पाटील जन्मशताब्दी समिती, विटा येथे स्थापन करण्यात आली. या समितीने युवकासाठी निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा यांचा उपक्रम सुरू केला. या दोन्ही उपक्रमांना महाराष्ट्रातील विद्यार्थी व युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. समाजामध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये क्रांतिसिंहाच्या विचाराने काम करत असलेल्या, सामाजिक भान असलेल्या व आयुष्यभर महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तीस क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार देऊन गौरवण्यास सुरूवात केली. 3 आगस्ट 2000 सालापासून क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार प्रदान केला जातो.

### निष्कर्ष:

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा याबाबत दोन प्रवाह होते. परंतु राजकीय व सामाजिक सुधारणा ही एकाच रथाची दोन चाके आहेत. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य उपयोगाचे नाही. यातूनच महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची चळवळ सुरू झाली.

समाजसुधारणा चळवळीमुळेच महाराष्ट्र हा पुरोगामी म्हणून ओळखला जातो. याला सांगली जिल्हाही अपवाद नाही. स्वातंत्र्यानंतर समाजात अनेक अनिष्ट रूढी, प्रथा परंपरा होत्या. त्या दूर करण्याचे काम साक्षरता प्रसार, गांधी लग्न पद्धती, स्त्री-पुरुष समता चळवळी धर्मांध शक्ती विरोधी लढा, क्रांती स्मृती वन निर्मिती, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य, जातीअंत संघर्ष समितीचे कार्य यासारख्या - चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळीतून अनेक नेतृत्व उदयास आले, त्यात महिला नेतृत्वाचाही समावेश आहे. या चळवळीतूनच सांगली जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या प्रगतिशील बनला.

महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीत सांगली जिल्हा अग्रभागी राहिला आहे. या संशोधनातून स्थानिक इतिहासावर प्रकाश पडला आहे. सरकारवर अंकुश ठेवणाऱ्या व सामाजिक चळवळी करणाऱ्या डाव्या आघाडीचे सध्या प्रभुत्व कमी झाल्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राला धक्का बसणाऱ्या अनेक घटना आज घडत आहेत.

### संदर्भ साधने:

1) पाटील उत्तमराव, क्रांतिवीर देशभक्त नाना पाटील, लोकविकास प्रकाशन, सातारा, 1995.

2) पवार जयसिंगराव, (संपा.); क्रांतिसिंह नाना पाटील, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2003.

3) यादव सुमीत, क्रांतिसिंह नाना पाटील-जीवन व कार्य, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, 2014.

4) धर्माधिकारी भा. वि.; क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी; क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती, वाळवा; 2007.

5) उगम फाऊंडेशन, बलवडी (भा.), संचलित क्रांतिस्मृतीवन वाटचाल पुस्तिका,

5) अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, डॉ. दाभोळकर प्रथम स्मृती विशेषांक, ऑगस्ट-सप्टेंबर 2014.

6) क्रांतिअग्रणी पर्व, पाक्षिक, कुंडल.

7) सा. कामगार जगत, विटा.

8) वृत्तपत्रे - दै. सत्यवादी कोल्हापूर, दै. सकाळ, कोल्हापूर, दै. श्रमिक विचार, सांगली, दै. अग्रदूत सांगली,

9) मुलाखतः डॉ. बाबुराव गुरव, तासगाव; डॉ. भारत पाटणकर, कासेगाव; रेहाना शेख, सांगली; सुभाष पाटील, हणमंतवडिये; संपतराव पवार, बलवडी.